पंतप्रधान नरेंद्र मोदी हे उद्धव ठाकरेंप्रमाणे खासदारांना दरवाजे बंद करत नाहीत
>> पान 2

अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंग क्षेत्राला 'अंब्रेला' संस्थेमुळे नवसंजीवनी - केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह
>> पान 3

श्री गुरु तेग बहादुरजींचे सर्वोच्च बलिदान मानवी हक्क आणि धार्मिक स्वातंत्र्याचा दीपस्तंभ - राज्यपाल जिष्णु देव वर्मा
>> पान 4


सुविचार
झाडं सुद्धा मुळं घट्ट धरून उभी राहतात.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 25 ■ रविवार, दि. 09 ऑगस्ट 2026 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




# केंद्र, राज्य मंत्रिमंडळात फेरबदल होण्याचे संकेत

## गृहमंत्री अमित शहा यांची मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री शिंदेंशी चर्चा

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई। प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची सह्याद्री अतिथीगृहात भेट घेतली. राज्यातील राजकीय स्थितीचा आढावा घेतानाच केंद्रीय मंत्रिमंडळासह राज्य मंत्रिमंडळातील फेरबदल आणि विस्तारावर या भेटीत चर्चा झाल्याचे समजते.

दिल्लीत सध्या संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळ विस्ताराच्या चर्चा होत्या. मात्र, त्या रखडल्या. पुढच्या आठवड्यात अधिवेशनाचे कामकाज संपणार आहे. त्यानंतर हा रखडलेला मंत्रिमंडळ विस्तार अपेक्षित आहे. भाजपच्या नव्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या घोषणेनंतर विस्ताराचा मार्ग मोकळा होणार असल्याची चर्चा आहे. या संभाव्य विस्तारात शिवसेना शिंदे गटाला दोन मंत्रिपदांची अपेक्षा आहे. श्रीकांत शिंदे आणि संजय जाधव यांचा शिवसेनेकडून मंत्रिमंडळात समावेश होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. दरम्यान, अलीकडेच ठाकरे गटातून शिंदेंच्या शिवसेनेत आलेले ओमराजे निंबाळकर यांचेही नाव आता पुढे आणले जात आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळातील या विस्तारासोबत राज्य मंत्रिमंडळातील फेरबदलाबाबतही शहा यांच्या सोबतच्या बैठकीत चर्चा झाल्याचे समजते. राज्यातील फडणवीस सरकारला आता दीड वर्ष झाले आहे. त्यामुळे मंत्र्यांच्या कामगिरीचे मुल्यमापन करून आगामी राजकारण समोर ठेवत मंत्रिमंडळात फेरबदलाची मागणी जोर धरत आहे. केंद्रातील फेरबदलानंतर राज्यातील मंत्रिमंडळातही फेरबदलांची शक्यता वर्तविली जात आहे.

**शहांशी चर्चेनंतर शिंदे पुन्हा दिल्लीकडे**

दरम्यान, एकनाथ शिंदे यांचे दिल्लीतील दौरे सध्या वाढले आहेत. शुक्रवारी शिंदे यांनी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. त्यानंतर शनिवारी मुंबईत अमित शहा, फडणवीस यांच्यासह राजकीय चर्चांची बैठक पार पडली. अमित शहा दुपारी मुंबईतून पुढे रवाना झाल्यानंतर एकनाथ शिंदेसुद्धा पुन्हा दिल्लीला रवाना झाले आहेत. मात्र, शिवसेनेकडून दरवर्षी दिल्लीत रक्तदान शिबिर घेतले जाते. त्या शिबिरासाठी शिंदे दिल्लीला रवाना झाल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, शिवसेना फुटीवरील सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी अंतिम टप्प्यात आली आहे. सुनावणी दरम्यान न्यायालयाने नोंदविलेली निरीक्षणे आणि शेऱ्यांमुळे राज्यात उलटसुलट चर्चा रंगल्या आहेत. या सुनावणीबाबतही शिंदे यांनी शहा यांच्याशी सल्लामसलत केल्याचे समजते.

### अमित शहा यांनी सुनेत्रा पवारांना भेट नाकारली!

अमित शहा यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना भेटीची वेळ दिली नसल्याचे समजते. शहा यांची 'सह्याद्री'वर फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यासोबत बैठक झाली. सुनेत्रा पवार यांच्या कार्यालयाकडूनही भेटीची वेळ मागितली गेली होती. मात्र, त्यांना वेळ देण्यात आली नाही. त्यामुळे केवळ फडणवीस, शिंदे आणि शहा अशीच चर्चा झाली. राष्ट्रवादी अजित पवार गटाने प्रशांत किशोर यांच्यासोबत चालविलेली सल्लामसलत भाजपला रुचलेली नाही. त्यामुळेच अमित शहा यांच्याकडून सुनेत्रा पवार यांना भेटीसाठी वेळ देण्यात आली नसल्याचा दावा सूत्रांनी केला आहे.

## गुजरातमध्ये चांदीपुरा विषाणूचा उद्रेक; मुंबईत बीएमसी अलर्ट, लक्षणे आणि उपाय जाणून घ्या

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई। प्रतिनिधी :** गुजरातमध्ये सध्या चांदीपुरा विषाणूचा उद्रेक सुरू आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिकेची यंत्रणा सावध झाली आहे. मात्र सद्यस्थितीत मुंबईत चांदीपुरा विषाणू बाधित एकही रुग्ण आढळलेला नाही, असे मुंबई महापालिकेच्या आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

चांदीपुरा विषाणूचा भारतातील हा पहिलाच उद्रेक नाही. यापूर्वी २००३–०४ मध्ये महाराष्ट्र, गुजरात व आंध्र प्रदेशासह भारतातील काही अन्य भागात या विषाणूचा उद्रेक झाला होता. सध्या गुजरातमध्ये या विषाणूचा उद्रेक झाला असला तरी केंद्र आणि राज्य शासनामार्फत सदर बाबतीत मार्गदर्शन सूचना प्राप्त झालेल्या नाहीत, असे आरोग्य विभागाचे म्हणणे आहे. मात्र तरीही पालिका प्रशासनाने याबाबत पूर्वतयारीचा आढावा घेतला.

याकरीता विलगीकरण सुविधेची तयारी आहे. संभाव्य रुग्ण व्यवस्थापनासाठी कस्तुरबा रुग्णालय येथे १० खाटांचा समर्पित विलगीकरण कक्ष तयार करण्यात येणार आहे. महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने आरोग्य सेवा विभाग, राज्य शासन आणि केंद्र शासन, राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्र (ऌण), नवी दिल्ली यांच्याशी समन्वय साधल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. सर्व शासकीय आणि खासगी रुग्णालये व प्रयोगशाळा यांच्याशी समन्वय साधण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.


## १५ अधिकारी जागेवर निलंबित पण ज्याने बिलावर सही केली त्याला सोडला! धाराशिवच्या कारवाईने राज्यात खळबळ

दैनिक आपला विदर्भ

**धाराशिव । प्रतिनिधी :** कृषी निविष्ठा घोटाळ्यातील दोषींवर कृषीमंर्त्यांच्या निर्देशानुसार १५ कृषी अधिकाऱ्यावर मोठी कारवाई झाली आहे. मात्र, ज्यांच्या स्वाक्षरीने सर्वाधिक बिले काढली गेली त्या तत्कालीन प्रभारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांना निलंबनातून वगळून अभय दिल्याने कृषिमंर्त्यांनी केलेल्या कारवाईवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. धाराशिव जिल्ह्याचे तत्कालीन कृषी अधीक्षक अधिकारी महादेव आसलकर याच्या सहीने या घोटाळ्याची बिल काढली गेली, त्यालाच कारवाईतून वगळल्याने चर्चा सुरू झाली आहे.

धाराशिव जिल्ह्यात २०२५–२६ च्या खरीप हंगामात राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियानातून २१ कोटी ३७ लाख रुपयांच्या कृषी निविष्ठा ५६ हजार शेतकरी लाभार्थ्यांना वितरीत केल्याचा दावा कृषी विभागाने केला होता. आमदार कैलास पाटील यांनी या दाव्यातील फोलपणा उघडकीस आणला. लाभार्थी शेतकऱ्यांच्या बोगस याद्या बनवून घोटाळ्यावर मूठमाती टाकण्याचा प्रयत्न अधिकाऱ्यांनी केला.

मात्र, रँडम तपासणीत मयत, भूमीहीन, मजुरांना लाभ दिल्याचा खोटा दावा उघडकीस आला. चौकशी अहवालानुसार कृषीमंत्री दत्ता भरणे यांनी दिलेल्या निर्देशानुसार ५ ऑगस्ट रोजी कृषी विभागाने १४ अधिकाऱ्यांचे निलंबन आणि एका अधिकाऱ्याची विभागीय चौकशी लावण्याचे आदेश काढले. ६ ऑगस्टला हे आदेश लातूरच्या कृषी सहसंचालकांना प्राप्त झाले. त्यानुसार धाराशिवचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र साळवे यांनी कार्यवाही पूर्ण करीत प्रभारी अधिकारी नियुक्त केले आहेत. मात्र, सूत्रधाराला अभय मिळाल्यामुळे अनेक उलट सुलट चर्चांना सुरुवात झाली आहे.




## आमचा तुमच्यावर विश्वास; सीजेपी आंदोलनानंतर मोदींचे तरुणांना आवाहन



**नवी दिल्ली। वृत्तसंस्था :** नीट पेपरफुटीविरोधात कॉक्रोच जनता पार्टीने जंतरमंतर येथे तीव्र आंदोलन केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधातील रोष वाढला होता. या घटनेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज पहिल्यांदा जाहीर भाषण केलं. यावेळी त्यांनी तरुण पिढीच्या क्षमता आणि सामर्थ्यावर विश्वास व्यक्त केला. नवी दिल्लीतील नामांकित भारतीय तंत्रज्ञान संस्थेच्या वार्षिक पदवीदान समारंभात पंतप्रधान नरेंद्र मोदी बोलत होते.

आमचा तुमच्यावर विश्वास आहे. देशाला तुमची गरज आहे, असं पंतप्रधान मोदी म्हणाले. प्रत्येक पिढीची राष्ट्रीय जबाबदारी असते, असं सांगून तरुणांच्या उद्दिष्टांमध्ये देशाचा सर्वांगीण विकास समाविष्ट असला पाहिजे, असं त्यांनी सुचवलं. तुम्हा सर्वांना माहीत आहे की प्रत्येक पिढीला त्यांच्या काळातील विशिष्ट आव्हानांना सामोरं जावं लागतं आणि त्यांची स्वत:ची राष्ट्रीय जबाबदारीही असते. तुमच्या आयुष्यातील पुढील ३० ते ३५ वर्षांत तुम्ही जे काही कराल, त्याचा परिणाम आमच्या 'विकसित भारत'च्या प्रवासावर होईल. त्यामुळे, तुम्ही घेतलेल्या प्रत्येक निर्णयाचा आधार हाच असावा, याचा देशाला कसा फायदा होईल? याद्वारे देशाची कोणती गरज पूर्ण होईल? असं ते म्हणाले.

आजच्या वेगाने बदलणाऱ्या जगात तंत्रज्ञान अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं पंतप्रधान मोदींनी सांगितलं. जे या बदलांशी जुळवून घेतील तेच अखेर जिंकतील, असं त्यांनी सुचवलं. जागतिक धोरणात्मक समीकरणे वेगाने बदलत आहेत. तंत्रज्ञानाच्या प्रगतीच्या वेगामुळे जागतिक सत्तेचा समतोल प्रत्येक क्षणाला बदलत आहे. पुढील २० किंवा ३० वर्षांत जग कसं दिसेल हे कोणीही खात्रीने सांगू शकत नाही. जग, तंत्रज्ञान, उद्योग आणि व्यवसाय सर्वच बदलतील. पण या सगळ्यात एक गोष्ट लक्षात ठेवा, जे शिकत राहतील तेच यशस्वी होतील, असं ते म्हणाले.

### गद्दारांना आता नेमके भय कसलेय?

**मुंबई। प्रतिनिधी :** चिंता नका, मी तुमच्या पाठिशी आहे हा धमकीवजा संदेश मोदींनी नेमका कोणाला दिलाय? आणि गद्दारांना आता नेमकं भय कसलंय? वॉशिंग मशिनमध्ये धुऊन घेतल्यानंतर सुद्धा घाबरून तुमची पळापळ का होतेय? का शेपट्या घालून तुम्ही मोदींकडे जाताय?'' अशा शब्दात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी हल्ला चढवला. हा संपूर्ण घटनाक्रम सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देणार असल्याचे उद्धव ठाकरे यांनी सांगितलं.

## नागपुरात जेन–झी आंदोलनाची धग; सीजेपी ची २७ ऑगस्टपासून 'जेन–झी रायझिंग टूर'

दैनिक आपला विदर्भ



**नागपूर । प्रतिनिधी :** परीक्षा पेपरफुटी, बेरोजगारी आणि शिक्षण व्यवस्थेतील प्रश्नांवरून चर्चेत आलेल्या कॉक्रोच जनता पार्टीच्या (सीजेपी) 'जेन–झी रायझिंग टूर'ची सुरुवात नागपुरातून होणार आहे. येत्या २७ ऑगस्टला नागपुरात या दौऱ्याचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती सीजेपीच्या नेहा बोरा यांच्याकडून देण्यात आली. दिल्लीतील आंदोलनानंतर देशभरातील तरुणांपर्यंत पोहोचण्याच्या उद्देशाने हा दौरा काढण्यात येत आहे.

परीक्षांमधील कथित गैरप्रकार, पेपरफुटी, रोजगार आणि शिक्षण व्यवस्थेशी संबंधित प्रश्नांवरून 'सीजेपी'च्या नेतृत्वाखाली दिल्लीमध्ये आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनामुळे तरुणांच्या प्रश्नांबरोबरच शिक्षण व्यवस्थेतील गैरप्रकार आणि सरकारी यंत्रणांच्या कार्यपद्धतीवरही चर्चा झाली. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणीही करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर 'सीजेपी'ने आता देशभरातील तरुणांशी संपर्क साधण्यासाठी 'जेन–झी रायझिंग टूर'ची घोषणा केली आहे. या दौऱ्याचा पहिला टप्पा नागपुरातून सुरू होत असल्याने विदर्भातील तरुणांचा प्रतिसाद महत्त्वाचा ठरणार आहे.

**नागपूरची निवड महत्त्वाची**

विदर्भातील विद्यार्थी आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या युवकांसाठी नागपूर हे महत्त्वाचे केंद्र आहे. शहरात विविध शैक्षणिक संस्था, कोचिंग क्लासेस आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठी संख्या आहे. त्यामुळे शिक्षण, परीक्षा आणि रोजगाराच्या प्रश्नांवर आधारित या दौऱ्यासाठी नागपूरची निवड करण्यात आल्याने स्थानिक पातळीवर या उपक्रमाला किती प्रतिसाद मिळतो, याकडे लक्ष लागले आहे. 'सीजेपी'कडून या दौऱ्याच्या माध्यमातून तरुणांशी संवाद साधण्याबरोबरच संघटनेचा विस्तार करण्यावर भर दिला जात आहे. नुकतीच देशव्यापी सदस्य नोंदणी मोहीमही सुरू करण्यात आल्याचे संघटनेकडून सांगण्यात आले आहे.

**'सीजेपी'ची भूमिका काय?**

कॉक्रोच जनता पार्टी (सीजेपी) ही तरुणांच्या प्रश्नांवर आंदोलन आणि सामाजिक दबावगटाच्या माध्यमातून काम करण्याचा प्रयत्न करणारी संघटना म्हणून पुढे आली आहे. परीक्षा व्यवस्थेतील कथित गैरप्रकार, पेपरफुटी, बेरोजगारी आणि शिक्षणाशी संबंधित प्रश्न हे संघटनेच्या प्रमुख मुद्द्यांमध्ये आहेत. 'सीजेपी'चे प्रमुख चेहरे असलेल्या अभिजीत दीपके यांनी संघटना तातडीने निवडणुकीच्या राजकारणात उतरणार नसून सध्या तरुणांच्या प्रश्नांवर सामाजिक दबाव निर्माण करण्यावर भर असल्याचे स्पष्ट केले आहे. 'सीजेपी'ने सात ऑगस्टलाच पंतप्रधान नरेंद्र मोदींना युवकांच्या शिक्षण, बेरोजगारी आणि महागाईच्या प्रश्नांवर स्वातंत्र्य दिनाच्या भाषणात स्पष्ट भूमिका मांडण्याची मागणी करणारी ऑनलाइन याचिका सुरू केली आहे. त्यामुळे नागपूर दौऱ्याला विशेष महत्त्व आहे.

## मोशी कचरा डेपो दुर्घटनेला महिना उलटला; पीडित कुटुंबांची मदतीसाठी प्रतीक्षा कायम!

**पिंपरी–चिंचवड । प्रतिनिधी :** पिंपरी–चिंचवड शहरातील मोशी कचरा डेपो येथे कचऱ्याचा अथांग डोंगर एका इमारतीवर कोसळून नऊ कर्मचाऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू झालेल्या भीषण दुर्घटनेला आज तब्बल एक महिना पूर्ण झाला आहे. या दुर्घटनेने संपूर्ण पिंपरी–चिंचवड शहर हादरले होते. मात्र, महिना उलटूनही या दुर्घटनेला जबाबदार कोण, इमारतीची उभारणी कशी झाली आणि सुरक्षेच्या नियमांकडे दुर्लक्ष नेमके कोणी केले, याबाबत अनेक प्रश्न अद्याप अनुत्तरित आहेत.दुर्घटनेनंतर महापालिका प्रशासनाने कारवाई करत तत्कालीन पर्यावरण प्रमुख संजय कुलकर्णी, प्रकल्प अभियंते योगेश आल्हाट आणि अग्निशमन अधिकारी ऋषिकांत चिपाडे या तिघांना निलंबित केले. मात्र, केवळ निलंबनाची कारवाई करून प्रकरण संपणार नाही, अशी भूमिका मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांनी घेतली आहे.

# राज्यात पावसाने गाठली सरासरी; मराठवाडा, विदर्भात चिंता कायम

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** एल – निनोच्या पार्श्वभूमीवर कमी पावसाची शक्यता असतानाही राज्यात यंदाच्या पावसाळ्यात आजपर्यंत ६३७.१ मिमी पाऊस पडला आहे, या काळात सरासरी ६२२.७ मिमी पाऊस पडतो, सरासरीपेक्षा दोन टक्के जास्त पाऊस पडला आहे. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात राज्यभरात पावसाने उघडीप दिली आहे. विदर्भ, मराठवाड्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडला आहे. सरासरीच्या तुलनेत हिंगोली सर्वात कमी पावसाची नोंद झाली आहे. राज्यात पावसाने सरासरी गाठली असली तरीही सर्वच जिल्ह्यात सरासरी गाठलेली नाही.

सरासरीपेक्षा जास्त पाऊस मुंबई उपनगर, पालघर, जळगाव, नाशिक, पुणे, सातारा, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांत पडला आहे. तर सरासरी इतका पाऊस मुंबई शहर, रायगड, रत्नागिरी, ठाणे, आहिल्यानगर, धुळे, कोल्हापूर, सांगली, धाराशीव, लातूर, नांदेड,परभणी, बुलडाणा, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यांत झाला आहे. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात राज्यभरात पावसाने उघडीप दिली आहे. या काळात राज्यात सरासरी १०.२ मिमी पाऊस पडतो, यंदा ३.६ मिमी पाऊस पडला आहे. पहिल्या आठवड्यात ६५ टक्के कमी पाऊस पडला आहे.

**विदर्भ, मराठवाड्यात पावसाची प्रतीक्षा**

वाशिम, नागपूर, गडचिरोली, चंद्रपूर, अमरावती, अकोला, जालना, हिंगोली, बीड, सोलापूर, नंदूरबार या जिल्ह्यांत सरासरीपेक्षा कमी पावसाची नोंद झाली आहे. हिंगोलीत सरासरीच्या तुलनेत ३६ टक्के कमी पाऊस झाला आहे. हिंगोलीत या काळात सरासरी ४६२.२ मिमी पाऊस पडतो, यंदा आजवर २९५.५ मिमी पाऊस पडला आहे.

**धरणांतील पाणीसाठा ७१ टक्क्यांवर**

राज्यातील लहान, मध्यम आणि मोठ्या, अशा एकूण ३०२९ धरणांमध्ये ७१,२३ टक्के पाणीसाठा झाला आहे. धरणांतील पाणीसाठा ३६८३५.६५ दलघमी इतका असून, एकूण पाणी साठवणूक क्षमता ४८५५३.६४ दलघमी इतकी आहे. विभागनिहाय नागपूरमध्ये ५८.९१ टक्के, अमरावतीत ५८.०३ टक्के, छत्रपती संभाजीनगर ४८.६९ टक्के, नाशिकमध्ये ७३.५४ टक्के, पुणे विभागात ८४.७८ टक्के, कोकण विभागात ८६.११ टक्के, असा एकूण पाणीसाठा ७१.२३ टक्क्यांवर गेला आहे.

**खरीप पेरणी ९० टक्क्यांवर**

मोसमी हंगामाच्या सुरुवातीला ओढ



दिलेल्या पावसाने जुलै महिन्यात दमदार हजेरी लावल्यामुळे खरीप हंगामातील पेरण्या ९० टक्क्यांवर गेल्या आहेत. खरीप हंगामातील सरासरी क्षेत्र १ कोटी ४४ लाख ३६ हजार ५४ हेक्टर आहे. त्यापैकी १ कोटी ३० लाख ५८ हजार ८६८ हेक्टर आहे. कोकण विभागात ६९ टक्के, नाशिक विभागात ९५ टक्के, पुणे विभागात ९३ टक्के, कोल्हापूर विभागात ९२ टक्के, छत्रपती संभाजीनगरमध्ये ९१ टक्के, लातूर विभागात ९१ टक्के, अमरावती विभागात ९३ टक्के आणि नागपूर विभागात ८२ टक्के, अशी एकूण ९० टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे.

## हवामान बदल, उष्णतेच्या लाटा, आगीमुळे युरोपातील परिस्थिती गंभीर बनतेय

युरोपमध्ये जंगलातील आगींमध्ये दोन महिन्यांतच सुमारे ३.१ अब्ज युरो (सुमारे ३३,७९० कोटी रुपये) इतके आर्थिक नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. यात फ्रान्स, स्पेन, पोर्तुगाल, ग्रीस आणि रोमानिया या युरोझोनमधील सर्वाधिक प्रभावित पाच देशांतील जळालेल्या जमिनी पूर्ववत करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाचाच समावेश आहे. हा आकडा युरोपियन कमिशनने संपूर्ण युरोपियन युनियनसाठी वर्तविलेल्या जंगलातील आगींमुळे होणाऱ्या सरासरी वार्षिक २.५ अब्ज युरो (सुमारे २७,२५० कोटी रुपये) नुकसानीपेक्षाही अधिक आहे. प्रत्येक वर्षी ज्या काळात नेहमी आगी लागतात त्या जंगलातील आग हंगामाच्या पहिल्या दोन महिन्यांतच यावर्षी सुमारे पाच लाख हेक्टर क्षेत्र जळून खाक झाले आहे. हा अंदाज युरोपियन कमिशनच्या पुनर्स्थापना खर्चाच्या पद्धतीवर आधारित असून तो फ्रान्स सरकारच्या आकडेवारीशी सुसंगत आहे. मात्र, या अंदाजात घरे, उद्योग, शेती, पर्यटन, विमा हप्त्यांतील वाढ, तसेच अग्निशमन उपकरणांवरील अतिरिक्त खर्चाचा समावेश करण्यात आलेला नाही. त्यामुळे प्रत्यक्ष आर्थिक नुकसान या अंदाजापेक्षा कितीतरी अधिक असण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. ईटीएच झुरिच येथील हवामान अर्थतज्ज्ञ सारा मेयर यांच्या मते, प्रत्यक्ष आर्थिक फटका या अंदाजाच्या तिपटीहूनही अधिक असू शकतो. या आगींचा सर्वाधिक फटका फ्रान्स आणि स्पेनला बसला आहे. फ्रान्समधील गिराँदे भागात एका भीषण आगीत सुमारे ४२ हजार हेक्टर जंगल जळून खाक झाले, तर सुमारे २ लाख २० हजार नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवावे लागले. तसेच, सफ्रान, दसॉ एव्हिएशन आणि एरियन ग्रुप यासारख्या एरोस्पेस कंपन्यांचे कामकाज काही काळ विस्कळीत झाले. स्पेनमध्येही हजारो हेक्टर शेती आणि कुरणांचे नुकसान झाले असून, केवळ अग्निशमन मोहिमेवरच यंदाच्या सुरुवातीपासून १.७ ते ३.३ अब्ज युरो (सुमारे १८,५३० कोटी ते ३५,९७० कोटी रुपये) खर्च झाल्याचा अंदाज आहे. तज्ज्ञांच्या मते, जंगलातील आगी रोखण्यासाठीच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा खर्च या नुकसानीच्या तुलनेत अत्यल्प आहे. जंगल व्यवस्थापन, नियंत्रित पद्धतीने आग लावणे, झुडपे व गवत साफ करणे आणि आग लवकर ओळखण्यासाठी आधुनिक यंत्रणा उभारल्यास मोठ्या प्रमाणावरील आगी टाळता येऊ शकतात. स्पेनमध्ये यासाठी दरवर्षी सुमारे ८०० दशलक्ष युरो (सुमारे ८,७२० कोटी रुपये) खर्च होतो. मात्र, प्रतिबंधासाठी खर्च केलेला एक युरो (१०९ रुपये) भविष्यात अग्निशमनासाठी लागणारे १०० युरो (सुमारे १०,९०० रुपये) वाचवू शकतो. युरोपातील अनेक देशांमध्ये जंगलातील आगींसाठी असलेल्या अर्थसंकल्पापैकी सुमारे ९० टक्के निधी आग विझविण्यावर खर्च होतो, तर केवळ १० टक्के निधी प्रतिबंधात्मक उपायांवर खर्च केला जातो. दरम्यान, कॉपर्निकस हवामान बदल सेवेनुसार, जून २०२६ हा पश्रि्चम युरोपच्या इतिहासातील सर्वाधिक उष्ण जून महिना ठरला. जर्मनीच्या रॉबर्ट कोख इन्स्टिट्यूटनुसार, २०२६ च्या सुरुवातीपासून उष्णतेशी संबंधित कारणांमुळे ५,१२० जणांचा मृत्यू झाला असून, बहुतांश मृत्यू जूनअखेरीस आलेल्या उष्णतेच्या लाटेदरम्यान झाले. हवामान बदलामुळे वाढत्या उष्णतेच्या लाटा आणि जंगलातील आगी युरोपसमोरील गंभीर आव्हान बनत असल्याचे या घडामोडींवरून स्पष्ट होत आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी हे उद्धव ठाकरेंप्रमाणे खासदारांना दरवाजे बंद करत नाहीत

## भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांचा संजय राऊतांवर प्रहार

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** संजय राऊत, तुमचे मालक उद्धव ठाकरे ना खासदारांना भेटत ना आमदारांना. कार्यकर्त्यांसाठी मातोश्रीचे दरवाजे बंद असतातच, पण आपल्या खासदारांसाठीही ते तुम्ही बंद ठेवता. त्यामुळेच तुमचे खासदार तुमची साथ सोडून जात असल्याने तुमच्या पक्षाची वाताहात झाली आहे. देशातील १४० कोटी जनतेचे नेतृत्व करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी सातत्याने सर्वच पक्षाच्या खासदारांना वेळ देऊन त्यांच्याशी चर्चा करतात. त्याचप्रमाणे काल त्यांनी शिवसेनेच्या खासदारांची भेट घेत त्यांच्याशी संवाद साधल्याने संजय राऊत यांचा तिळपापड होण्याचे काय कारण, असा असा करडा सवाल भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी शनिवारी उपस्थित केला. भाजपा प्रदेश कार्यालयातील पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदीजी कुणाला




जिलेबी, फाफडा आणि ढोकळा भरवत होते, हे पाहण्यासाठी संजय राऊत तिथे लपून बसले होते का, असा सवाल करत श्री. बन म्हणाले, संजय राऊत, तुम्ही मातोश्रीत कुणाला तेलकट वडे देत होता ते राज ठाकरे यांनी महाराष्ट्राला सांगितले आहेच. आता तुम्ही तुमच्या खासदार, आमदारांना मातोश्रीवरचे तेलकट वडेही देत नाहीत. जिलेबी, फाफडा, ढोकळा हा गोंधळ करण्यापेक्षा मातोश्रीवरच्या तेलकट वड्यांचा इतिहास आठवा. काँग्रेससोबत राहून सेटिंग करायचे, एवढेच तुम्हाला जमतेय. राहिला प्रश्न सर्वोच्च न्यायालयावर दबाव आणण्याचा, तर न्यायालयात निकाल लागायचा तो लागेल. परंतु जनता वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांच्या आणि एकनाथजी शिंदे यांच्या पाठीशी आहे. महाराष्ट्रातील जनतेने खऱ्या शिवसेनेवर शिक्कामोर्तब केले आहे.

नारीशक्ती विधेयक मंजूर होणार नाही, असा दावा संजय राऊत करतात. नारीशक्ती विधेयकाला विरोध करत तुम्ही महिलांचा अपमान करत आहात. पश्चिम बंगालच्या निवडणुकीत लाडक्या बहिणींचा, महिलांचा अपमान केल्यानंतर ममतादीदींची काय अवस्था झाली, हे देशाने पाहिलेय. तुम्ही महिला आरक्षण विधेयकाला विरोध करत असल्याने या देशातील माता-भगिनी तुम्हाला माफ करणार नाहीत. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत त्या तुम्हाला चांगलाच धडा शिकवतील. तुम्हाला भीती आहे की, उद्या रणरागिणी महिला सभागृहात आल्या तर आपली पळता भुई थोडी होईल. तुम्ही कशा पद्धतीने महिलांना शिवीगाळ करता हे महाराष्ट्राने तुमच्या तोंडातून ऐकलेले असल्याने नारी सन्मान, नैतिकता या मुद्द्यावर बोलण्याचा तुम्हाला अधिकार नाही, असे श्री. बन यांनी सुनावले.

संजय राऊत, विधानसभा आणि महापालिका निवडणुकीत महाराष्ट्रातल्या जनतेने तुमचा लंगोट खेचून तुम्हाला नागडे केले आहे. त्यामुळे अमितभाई शाह यांच्यावर टीका करण्यापेक्षा महाराष्ट्रातल्या जनतेने आपले वस्त्रहरण का केले, याचे आत्मपरीक्षण करा. कुंभमेळ्याची कंत्राटे मराठी माणसालाही मिळतात. राज ठाकरे यांना मराठी कंत्राटदारांची नावे पाठवून देतो, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सांगितलेय. संजय राऊत, उद्धवजी ठाकरे यांनाही आम्ही मराठी कंत्राटदारांची नावे पाठवून देऊ. परंतु २५ वर्षे मुंबई महापालिका लुटत असताना असताना तुम्ही किती मराठी कंत्राटदारांना संधी दिली होती याची यादी एकदा संजय राऊतांनी पत्रकार परिषदेत सादर करावी, असे आव्हानही श्री. बन यांनी दिले.

## कर्णधार म्हणून रोहित शर्माची निवड; पाकिस्तानच्या एकाही खेळाडूचं नाव नाही

**नवी दिल्ली। वृत्तसंस्था :** पाकिस्तानचा स्टार अष्टपैलू शादाब खान सध्या एका मुलाखतीमुळे चर्चेत आला आहे. एका रॅपिड-फायर चॅलेंजमध्ये शादाबला टी-२० खेळाडू निवडण्यास सांगण्यात आले. मात्र, त्याने केलेल्या निवडीने पाकिस्तानच्या क्रिकेट चाहत्यांना चांगलाच धक्का बसला. कारण शादाबने तयार केलेल्या आपल्या परफेक्ट टी-२० प्लेअरमध्ये पाकिस्तानच्या एकाही खेळाडूला स्थान दिले नाही. विशेष म्हणजे, संघाचा कर्णधार आणि सलामीवीर म्हणून त्याने भारताचा माजी कर्णधार रोहित शर्माची निवड केली. शादाब खानचा हा मुलाखतीतील व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, पाकिस्तानमधील क्रिकेट चाहते त्याच्यावर नाराजी व्यक्त करत आहेत. शादाबने भारत, वेस्ट इंडिज, दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंडच्या दिग्गज खेळाडूंवर विश्वास दाखवत आपली टी-२० टीम तयार केली.

शादाबसमोर सर्वात आधी संघाचा ओपनर आणि कर्णधार निवडण्याची वेळ आली. त्यावेळी त्याने कोणत्याही पाकिस्तानी खेळाडूचा विचार न करता रोहित शर्माचे नाव घेतले. रोहित शर्मा हा ऊ२० क्रिकेटमधील आक्रमक फलंदाजीसाठी ओळखला जातो. सुरुवातीपासूनच गोलंदाजांवर दबाव निर्माण करण्याची क्षमता, मोठे फटके खेळण्याची ताकद आणि सामन्याचा वेग बदलण्याची क्षमता यामुळे शादाबने रोहितला आपल्या परफेक्ट ऊ२० टीमचा कर्णधार बनवलं. पुढे पावर हिटरची निवड करताना शादाबने वेस्ट इंडिजच्या निकोलस पूरनवर विश्वास दाखवला. पूरन हा जगभरातील ऊ२० लीगमध्ये आपल्या आक्रमक फलंदाजीसाठी प्रसिद्ध आहे.

अष्टपैलू खेळाडूसाठी पोलार्डची निवड

बेहतरीन अष्टपैलू खेळाडू म्हणून शादाबने वेस्ट इंडिजचा माजी दिग्गज कीरोन पोलार्ड निवडला. पोलार्डने जगभरातील ऊ२० क्रिकेटमध्ये आपल्या

# ऑगस्ट क्रांती दिन : 'चले जाव'ची हाक आजही का ऐकू येत नाही?

९ ऑगस्ट हा केवळ दिनदर्शिकेतील एक दिवस नाही. हा दिवस भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील आत्मसन्मान, त्याग, धैर्य आणि सामूहिक निर्धाराचा दिवस आहे. ९ ऑगस्ट १९४२ रोजी 'भारत छोडो' आंदोलनाची ठिणगी पडली आणि ब्रिटिश सत्तेला भारतातून हद्दपार करण्याचा अंतिम निर्णायक लढा सुरू झाला. महात्मा गांधींनी दिलेली 'करेंगे या मरेंगे' ही हाक केवळ राजकीय घोषणा नव्हती, तर ती गुलामगिरीच्या मानसिकतेविरुद्धची बंडाची भाषा होती. आज स्वातंत्र्याला जवळपास आठ दशके होत आली. ब्रिटिश गेले. सत्ता आपल्या हातात आली. संविधान मिळाले. मतदानाचा अधिकार मिळाला. विकासाच्या असंख्य संधी निर्माण झाल्या. तरीही एक प्रश्न अस्वस्थ करतो. तो म्हणजे १९४२ मध्ये ज्यांनी परकीय सत्तेला 'चले जाव' म्हटले, त्यांच्या स्वप्नातील भारत आपण खरोखर घडवला आहे का? हा प्रश्न स्वतःला विचारण्याची गरज ऑगस्ट क्रांती दिनाच्या निमित्ताने आहे. 'चले जाव' म्हणजे केवळ ब्रिटिशांना हाकलणे नव्हते!

भारत छोडो आंदोलनाचा अर्थ फक्त ब्रिटिशांनी भारत सोडावा एवढाच मर्यादित नव्हता. तो भारतीय जनतेच्या आत्मसन्मानाचा हुंकार होता. अन्याय, शोषण आणि गुलामगिरीविरुद्ध उभे राहण्याची ती चेतना होती. गांधीजींच्या नेतृत्वाखाली लाखो सामान्य माणसे या आंदोलनात उतरली. विद्यार्थी, शेतकरी, कामगार, महिला, व्यापारी, शिक्षक इत्यादिंनी समाजातील प्रत्येक घटकाने आपापल्या परीने योगदान दिले. नेत्यांना अटक झाली, आंदोलने दडपली गेली, गोळ्या झाडल्या गेल्या, तुरुंग भरले पण स्वातंत्र्याची आस दडपता आली नाही. कारण क्रांती नेतृत्वाने सुरू केली असली तरी ती जनतेने आपल्या रक्ताने पुढे नेली होती. म्हणूनच ऑगस्ट क्रांतीचा इतिहास केवळ काही मोठ्या नेत्यांच्या नावांपुरता मर्यादित करणे हा त्या इतिहासावर अन्याय ठरेल. हजारो ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान त्यामागे आहे.



विदर्भाची क्रांतीची धग ही १९४२ च्या आंदोलनाची ज्वाला विदर्भातही धगधगली. चिमूर, आष्टी, यावली यांसारख्या भागांत जनतेने ब्रिटिश सत्तेला थेट आव्हान दिले. विदर्भाच्या मातीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या भजन-कीर्तनातून राष्ट्रभक्तीची चेतना जागवली. त्यांचे प्रबोधन म्हणजे केवळ अध्यात्म नव्हते, त्यात राष्ट्रनिर्मितीची हाक होती. सामान्य माणसाच्या भाषेतून स्वातंत्र्याचा अर्थ सांगणाऱ्या तुकडोजी महाराजांनी जनतेला जागे केले. त्यांच्या शब्दांतून गावागावांत राष्ट्रभक्तीचा अंगार पेटला. चिमूर-आष्टीच्या आंदोलनाने ब्रिटिश सत्तेला हादरा दिला. अनेकांनी प्राणांची आहुती दिली. या शहीदांचे स्मरण करताना एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. त्यांनी स्वातंत्र्य आपल्या पुढच्या पिढीच्या सुखासाठी मिळवून दिले, स्वतःच्या सुखासाठी नव्हे. आज आपण त्यांच्या त्यागाचे ऋणी आहोत. आजचा प्रश्न अधिक कठीण आहे, आज ब्रिटिश नाहीत. मग आज 'चले जाव' कोणाला म्हणायचे? त्याचे उत्तर स्पष्ट आहे. अज्ञानाला चले जाव! जातीय द्वेषाला चले जाव!भ्रष्टाचाराला चले जाव! अंधश्रद्धेला चले जाव! स्त्रीद्वेषाला चले जाव! गरीबी आणि विषमतेला चले जाव! आणि संविधानविरोधी मानसिकतेला चले जाव!

आजचा भारत राजकीयदृष्ट्या स्वतंत्र आहे, पण सामाजिक आणि मानसिक स्वातंत्र्याचा प्रवास अजून पूर्ण झालेला नाही. जात, धर्म, भाषा, प्रदेश यांच्या नावावर समाजात भिंती उभ्या राहतात. सोशल मीडियावर द्वेषाची भाषा वाढते. खोट्या माहितीचा प्रसार होतो. शिक्षण असूनही विवेक हरवतो. विकास होत असतानाच विषमता वाढते. म्हणून आजची क्रांती बंदुकीची नसून विचारांची असायला हवी. लोकशाही वाचवणे हीच आजची क्रांती. स्वातंत्र्यसैनिकांनी परकीय सत्तेविरुद्ध लढा दिला. आज आपली जबाबदारी लोकशाही मजबूत करण्याची आहे. संविधानाने आपल्याला अधिकार दिले पण त्याचबरोबर कर्तव्यांचीही जाणीव करून दिली. मतदान करणे म्हणजे केवळ बोटावर शाई लावून घेणे नव्हे. योग्य प्रश्न विचारणे, सत्तेला जाब विचारणे, सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे, कायद्याचा सन्मान करणे आणि दुर्बलांच्या हक्कासाठी आवाज उठवणे, ही सुद्धा लोकशाहीची कर्तव्ये आहेत. लोकशाहीत नागरिक शांत राहिला तर सत्ता अधिक शक्तिशाली होते; पण जागरूक नागरिक प्रश्न विचारतो तेव्हा लोकशाही अधिक मजबूत होते. म्हणूनच आजच्या पिढीला ऑगस्ट क्रांतीचा इतिहास पाठ करून उपयोग नाही. त्या इतिहासामागची विचारांची आग समजून घेणे आवश्यक आहे.

आजच्या तरुणाईने इतिहासातून काय शिकायचे? १९४२ च्या आंदोलनात तरुणांचा सहभाग मोठा होता. आजची तरुणाई तंत्रज्ञानाच्या युगात जगते. हातात स्मार्टफोन आहे, जग बोटांच्या टोकावर आहे. माहितीचा स्फोट झाला आहे, पण विवेकाचा विकास तितक्याच वेगाने झाला आहे का? हा प्रश्न गंभीर आहे. तरुणांनी सोशल मीडियावर केवळ प्रतिक्रिया देणारे नव्हे, तर विचार करणारे नागरिक बनले पाहिजे. देशभक्ती म्हणजे केवळ घोषणाबाजी नाही. राष्ट्रगीताच्या वेळी उभे राहणे महत्त्वाचेच, पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे देशातील अन्याय पाहून अस्वस्थ होणे. सीमेवर सैनिक देशाचे रक्षण करतो, तर नागरिकाने लोकशाही, संविधान, सामाजिक सलोखा आणि सार्वजनिक नैतिकतेचे रक्षण केले पाहिजे, हीच खरी देशभक्ती. ९ ऑगस्टला आपण शहीदांना पुष्पहार अर्पण करू. भाषणे होतील. घोषणाबाजी होईल. सोशल मीडियावर संदेश फिरतील. पण दुसऱ्याच दिवशी आपण पुन्हा जुन्याच मानसिकतेत परतलो तर त्या श्रद्धांजलीला अर्थ उरणार नाही. म्हणून शहीदांना अभिवादन शब्दांनी नव्हे, कृतीने! शहीदांनी आपल्याला स्वातंत्र्य दिले, आपल्यावर भारत घडविण्याची जबाबदारी सोपवली. त्यामुळे ऑगस्ट क्रांती दिन हा उत्सव नसून आत्मपरीक्षणाचा दिवस आहे.

आपण स्वतःला विचारले पाहिजे, मी समाजासाठी काय करतो? अन्याय दिसल्यावर मी आवाज उठवतो का? जात-धर्माच्या पलीकडे माणूस म्हणून दुसऱ्याला स्वीकारतो का? संविधानातील मूल्ये माझ्या आचरणात आहेत का? देशभक्ती माझ्या कृतीत आहे का? या प्रश्नांची उत्तरे प्रामाणिक असतील तरच ऑगस्ट क्रांतीची मशाल जिवंत राहील. क्रांती आजही संपलेली नाही! १९४२ची क्रांती ब्रिटिश सत्तेविरुद्ध होती. आजची क्रांती आपल्या आतल्या कमकुवतपणाविरुद्ध आहे. स्वार्थ, द्वेष, असहिष्णुता, भ्रष्टाचार आणि उदासीनता यांच्याविरुद्ध प्रत्येक नागरिकाने उभे राहणे आवश्यक आहे.



कारण देश बदलण्यासाठी नेहमी मोठी क्रांती आवश्यक नसते. एका विद्यार्थ्याने प्रामाणिकपणे अभ्यास करणे, एका तरुणाने व्यसनाला नकार देणे, एका नागरिकाने लाच देण्यास नकार देणे, एका व्यक्तीने जातीय द्वेषाला विरोध करणे, एका महिलेला समान सन्मान देणे, ही देखील राष्ट्रनिर्मितीची क्रांतीच आहे.

९ ऑगस्ट आपल्याला एकच प्रश्न विचारतो. स्वातंत्र्य मिळाले, पण आपण खऱ्या अर्थाने स्वतंत्र झालो का? स्वातंत्र्य मिळविणे कठीण होते पण ते टिकविणे त्याहून कठीण आहे. ब्रिटिश गेले पण अज्ञान राहिले. परकीय सत्ता गेली पण सामाजिक विषमता राहिली. गुलामगिरी गेली पण मानसिक गुलामगिरीची सावली अजूनही आहे. म्हणूनच आज शहीदांच्या स्मृतीसमोर नतमस्तक होताना एकच संकल्प करू या. भारत केवळ आर्थिकदृष्ट्या महासत्ता नव्हे, तर सामाजिक न्याय, समता, बंधुता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवी मूल्यांचा देश बनवू या. म्हणून आज पुन्हा एका नव्या 'चले जाव'ची गरज आहे. भ्रष्टाचाराला चले जाव! जातीय द्वेषाला चले जाव! अंधश्रद्धेला चले जाव!असहिष्णुतेला चले जाव! अन्यायाला चले जाव!

१९४२ मध्ये स्वातंत्र्यसैनिकांनी "करेंगे या मरेंगे" अशी प्रतिज्ञा केली होती. आज आपल्या पिढीची प्रतिज्ञा असावी "अन्यायाशी लढू, संविधान जपू, द्वेषाच्या भिंती तोडू, माणुसकीची मशाल पेटवू!" ऑगस्ट क्रांती दिन केवळ इतिहास आठवण्याचा दिवस नाही तर तो इतिहास आपल्या वर्तमानात जगण्याचा दिवस आहे. 'चले जाव'ची हाक ब्रिटिशांसाठी होती, आजची हाक अन्यायासाठी असू द्या! अज्ञान, विषमता, भ्रष्टाचार आणि द्वेषाला 'चले जाव' म्हणा आणि संविधानाच्या मार्गाने नवा भारत घडवा!

जय हिंद!

**प्रवीण बागडे**
**नागपूर**
**मो.क्र. ९९२३६२०९१९**


DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### अल्पवयीन व विनापरवाना वाहनचालकांवर पोलिसांची कडक कारवाई; २८० वाहनांवर कारवाई





दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर । प्रतिनिधी :** जिल्ह्यात अल्पवयीन मुले तसेच विनापरवाना वाहन चालविणाऱ्यांविरोधात चंद्रपूर वाहतूक पोलिसांनी विशेष मोहीम राबविली. शाळा, महाविद्यालये, कोचिंग क्लासेस तसेच बाजार परिसरात ही कारवाई करण्यात आली. या मोहिमेदरम्यान संपूर्ण जिल्ह्यात २८० वाहनांवर कारवाई करण्यात आली. अल्पवयीन वाहनचालकांच्या पालकांना पोलीस ठाण्यात बोलावून समज देण्यात आली. अल्पवयीन मुलांनी वाहन चालवल्यामुळे अपघात होऊन त्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो, त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांना वाहन देऊ नये, असे आवाहन पोलिसांनी केले.या कारवाईत पालकांकडून २ लाख ८६ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. अल्पवयीन व विनापरवाना वाहनचालकांविरोधातील ही मोहीम यापुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याची माहिती वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल बारापात्रे यांनी दिली.वाहतूक नियमांचे पालन करा, अल्पवयीन मुलांना वाहन देऊ नका, असे आवाहनही पोलिसांनी केले आहे.

### गरोदर पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन पतीने पाजले डेटॉल

दैनिक आपला विदर्भ

**पुणे। प्रतिनिधी :** पुण्यातून सासरच्या छळाच्या दोन अत्यंत संतापजनक आणि हादरवून टाकणाऱ्या घटना समोर आल्या आहेत. लग्नात योग्य पाहुणचार केला नाही आणि हुंड्यात किमती वस्तू दिल्या नाहीत यांसारख्या क्षुल्लक कारणांवरून विवाहित महिलांना शारीरिक व मानसिक त्रास दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. एका घटनेत तर संशयी पतीने गरोदर असतानाही पीडित पत्नीला बळजबरीने 'डेटॉल' पाजल्याचा अंगावर काटा आणणारा प्रकार घडला आहे. या दोन्ही गंभीर प्रकरणांची दखल घेत पुणे पोलिसांनी संबंधित आरोपींविरोधात कठोर कायदेशीर कारवाई केली आहे. काळेपडळ पोलीस ठाण्यात एका २२ वर्षीय विवाहितेने यासंदर्भात फिर्याद दाखल केली आहे. पीडितेच्या पतीने तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला सातत्याने अमानुष मारहाण केली. एवढेच नव्हे तर, ती गरोदर असताना तिच्या सासरच्या मंडळींनी तिला बळजबरीने 'डेटॉल' पिण्यास भाग पाडले.

याप्रकरणी पोलिसांनी पती प्रतीक पिंगळे (वय २७) आणि सासू वंदना सुनील पिंगळे (वय ४५, दोन्ही रा. अक्कलकोट) यांच्याविरोधात काळेपडळ पोलीस ठाण्यात विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.

### शाळा सुटल्यानंतर 13 वर्षीय मुलीचे अपहरण; दुचाकीवर बसवून निर्जनस्थळी नेऊन अत्याचार

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील माहिम परिसरात एका धक्कादायक घटनेमुळे खळबळ माजली आहे. एका १३ वर्षीय मुलीचे शाळा सुटल्यानंतर दुचाकीवरून जबरदस्तीने अपहरण करण्यात आलं. त्यानंतर तिला निर्जन ठिकाणी नेण्यात आलं आणि तिथे सामूहिक लैंगिक अत्याचार करण्यात आला. या प्रकरणात पीडित मुलीने पोलिसांकडे तक्रार केली आहे. या तक्रारीनंतर पोलिसांनी दोन अल्पवयीन मुलांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

माहिम परिसरातील संतापजनक घटना!

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार १८ जूनला ही धक्कादायक घटना घडली आहे. या दिवशी माहिममधील एका नामांकित शाळेतून १३ वर्षीय मुलगी बाहेर पडली तेव्हा एका दुचाकीवर १६ वर्षीय मुलाने जबरदस्ती बसवलं. त्यानंतर तिला निर्जनस्थळी घेऊन गेली. तिथे तिचे हात - पाय बांधले. बाइकवरुन घेऊन जाणारा अल्पवयीन मुलगा हा पीडित मुलीच्या ओळखीचा होता. पण तिथे असलेला दुसरा मुलगा हा अनोळखी आणि तोही अल्पवयीन होता. या दोघांनी हात - पायासोबत तोंडालाही पट्टी बांधली आणि त्यानंतर त्या मुलीवर लैंगिक अत्याचार केला.

धक्कादायक म्हणजे पीडित मुलीने या घटनेची वाचा फोडू नये म्हणून तिला धमकी दिली. तुझे फोटो एडिट करुन सोशल मीडियावर व्हायरल करुन समाजात तुझी बदनामी करु असं आरोपींनी तिला धमकी दिली होती. या धमक्यांमुळे मुलगी गेल्या अनेक दिवस मानसिक तणावाखाली होती. मात्र, अखेर तिने पालकांना तिच्यासोबत झालेल्या अत्याचाराबद्दल सांगितलं. संतापलेल्या पालकांनी तातडीने माहिम पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंग क्षेत्राला 'अंब्रेला' संस्थेमुळे नवसंजीवनी - केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह

## 'राष्ट्रीय शहरी सहकारी वित्त व विकास महामंडळा'चे मुख्यालय महाराष्ट्रात होणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंग क्षेत्राला आधुनिक, पारदर्शक, विश्वासार्ह आणि तंत्रज्ञानाधिष्ठित बनविण्यासाठी 'अंब्रेला ऑर्गनायझेशन' महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. या माध्यमातून देशातील प्रत्येक तहसीलपर्यंत अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंगचे जाळे विस्तारण्याला मोठी चालना मिळेल, असा विश्वास केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी आज व्यक्त केला. देशातील अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंग क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत त्यांनी राष्ट्रीय शहरी सहकारी वित्त व विकास महामंडळाचे मुख्यालय दिल्लीहून महाराष्ट्रात हलवण्यात येईल, अशी घोषणा केली.

बीएसई इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर, मुंबई येथे आयोजित 'सहकार नव-क्रांती मेळावा' कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सहकार राज्यमंत्री कृष्णपाल गुर्जर, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, पणन मंत्री जयकुमार रावल, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, राष्ट्रीय नागरी सहकारी वित्त विकास महामंडळाचे अध्यक्ष ज्योतिंद्र मेहता, केंद्रीय सहकार मंत्रालयाचे सचिव डॉ. आशीष कुमार भूटानी तसेच अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री शहा म्हणाले की, देशातील प्रत्येक अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेने, अगदी एका शाखेच्या बँकेनेही अंब्रेला ऑर्गनायझेशनचे सदस्यत्व घ्यावे. सदस्यत्व घेतल्यानंतर सुरक्षा संचालन केंद्राशी (सिक्युरिटी ऑपरेशन सेंटरशी) जोडले जावे. यामुळे बँकांमधील ठेवीदारांचा विश्वास वाढण्यास मदत होईल आणि बँकिंग क्षेत्र अधिक सुरक्षित होईल. अंब्रेला संस्था बँकिंग क्षेत्रात करण्यात येत असलेल्या नवीनतम सुधारणांची माहिती तसेच म्यूल हंटरसारख्या अनेक आवश्यक सॉफ्टवेअर सुविधा देखील या माध्यमातून उपलब्ध करून दिल्या जातील. अंब्रेला संस्थेच्या मदतीने कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमही आयोजित करता येतील, जे कर्मचाऱ्यांसाठी अत्यावश्यक ठरणार आहे. स्पर्धात्मक बँकिंग क्षेत्रात इतरांच्या बरोबरीने उभे राहण्यासाठी तसेच जनता आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा विश्वास संपादन करण्यासाठी अंब्रेला संस्था मार्गदर्शक ठरणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

देशातील सुमारे १,४०० अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांमध्ये सुमारे सहा लाख कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. देशाच्या आर्थिक विकासात या बँकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. छोटे दुकानदार, व्यापारी, कुटीर उद्योग, एमएसएमई, स्थानिक व्यावसायिक, महिला बचत गट तसेच मध्यमवर्गीयांच्या विविध



गरजा पूर्ण करण्यासाठी छोट्या कर्जांची आवश्यकता असते. मोठ्या बँकांना अनेकदा या गरजा पूर्ण करणे शक्य होत नाही; मात्र तालुका पातळीवरील अर्बन को-ऑपरेटिव्ह बँका ही भूमिका प्रभावीपणे पार पाडू शकतात. कर्जाची रक्कम जितकी कमी तितकी त्याची परतफेडीची शक्यता अधिक असते. कोणत्याही हमी किंवा तारणाशिवाय कर्ज देण्याची मर्यादा आता अडीच लाख रूपयांवरून पाच लाख रुपये करण्यात आली आहे. या योजनेतील तब्बल ९९.७८ टक्के कर्जांची व्याजासह परतफेड झाली आहे. यावरून छोट्या कर्जदारांची कर्जफेडीची क्षमता स्पष्ट होते, असे त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्रात ४४९ सहकारी बँका असून देशातील सहकारी बँकिंग क्षेत्रात महाराष्ट्राचे मोठे योगदान आहे. महाराष्ट्रासह गुजरात, गोवा आणि कर्नाटक या राज्यांमध्ये देशातील मोठ्या प्रमाणावर शहरी सहकारी बँका कार्यरत आहेत. त्यामुळे शहरी सहकारी बँकिंग क्षेत्राच्या अंब्रेला संस्थेचे मुख्यालय महाराष्ट्रात असणे अधिक उपयुक्त ठरेल. देशातील शहरी सहकारी बँकांना 'अम्ब्रेला ऑर्गनायझेशन'च्या माध्यमातून एकत्र आणण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न पाहिले आहे. 'सहकारातून समृद्धी'चा अर्थ केवळ बँक किंवा संस्थेची समृद्धी नसून, बँकेच्या ग्राहकाला समृद्ध करणे हा आहे. शहरी सहकारी बँकिंग क्षेत्राला आधुनिक, सुरक्षित, पारदर्शक आणि जागतिक स्तरावर सक्षम करण्यासाठी 'अम्ब्रेला ऑर्गनायझेशन'च्या माध्यमातून आज महत्त्वपूर्ण सुरुवात झाली आहे, असे केंद्रीय मंत्री शाह यांनी यावेळी सांगितले.

देशात डिजिटल व्यवहार मोठ्या प्रमाणावर वाढत असताना डिजिटल फसवणुकीचे प्रकारही वाढत आहेत. त्यामुळे ऑनलाइन बँकिंग सुरक्षित करण्यासाठी फॉरेन्सिक तंत्रज्ञानाची मदत घेणे आवश्यक आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने 'म्यूल हंटर'सारखे उपक्रमही सुरू केले आहेत. राष्ट्रीय फॉरेन्सिक विज्ञान विद्यापीठासोबत आज झालेल्या सामंजस्य करारामुळे सायबर सुरक्षा, डिजिटल फसवणूक प्रतिबंध, डिजिटल फॉरेन्सिक, बँकिंग सुरक्षेसह कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण यासाठी आवश्यक सुविधा

उपलब्ध होतील. यावेळी शहरी सहकारी बँकांसाठी सुरक्षा संचालन केंद्राचीही सुरुवात करण्यात आली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री शाह यांच्या हस्ते शहरी सहकारी बँकांसाठी सायबर सुरक्षेसंदर्भातील सिक्युरिटी ऑपरेशन्स सेंटर () चे दूरस्थ पद्धतीने उद्घाटन करण्यात आले. भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी उप-महाव्यवस्थापक जी. पी. मिस्त्री लिखित 'ऑपरेशनल रिस्क मॅनेजमेंट अ प्रॅक्टिकल गाईड टू अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

सहकार सीबीएस प्रणालीशी यशस्वीरीत्या जोडल्या गेलेल्या प्रथम सहा शहरी सहकारी बँकांच्या प्रतिनिधींचा सत्कार यावेळी करण्यात आला. राष्ट्रीय सेवा बंडलअंतर्गत 'कोर बँकिंग सर्व्हिस' आणि संबंधित सेवांचे लोकार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. नॅशनल फॉरेन्सिक सायन्सेस युनिव्हर्सिटी आणि एनयूसीएफडीसी यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

नागरी सहकारी वित्त विकास महामंडळाचे अध्यक्ष ज्योतिंद्र मेहता यांनी प्रास्ताविक केले तर एनयूसीएफडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रभात चतुर्वेदी आभार यांनी मानले.

# मनोज जरांगेंनंतर आता नरेंद्र पाटीलही आक्रमक; मराठा युवकांच्या जात प्रमाणपत्रावरुन अधिकाऱ्यांवर संताप

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** राज्यात उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणानंतर कुणबी मराठा समाजातील बांधवांना जात प्रमाणपत्र मिळाले, ओबीसीमधून हे जातीचे प्रमाणपत्र मिळाल्याने मराठा बांधवांनीही आनंद व्यक्त केलाय. मात्र, आता जात प्रमाणपत्र देताना किंवा जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र दिले जात नसल्याने वाद उद्भवला आहे. तर, काहींची जात प्रमाणपत्रही रद्द करण्यात येत असल्याने मनोज जरांगे पाटील यांनी थेट सरकारला धारेवर धरलंय. त्यातच, आता आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनीही जात प्रमाणपत्र देताना काही अधिकारी खोडसाळपणा करतात, काही काही अधिकारी अति हुशार असतात, असे म्हणत प्रशासनाला लक्ष्य केलंय.

जात प्रमाणपत्र देताना काही अधिकारी जाणीवपूर्वक खोडसाळपणा करतात, असा गंभीर आरोप नरेंद्र पाटील यांनी केला आहे. महामंडळातील अधिकाऱ्यांकडून लावण्यात येणाऱ्या अटी-शर्तींवरून नरेंद्र पाटील यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. याबाबत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंर्त्यांकडे वारंवार तक्रारी करूनही कारवाई झाली नसल्याचा दावा त्यांनी केला आहे.

त्यामुळे मराठा समाजातील तरुणांना एकत्रित करून सरकारविरोधात आंदोलन उभारण्याचा इशाराही नरेंद्र पाटील यांनी दिला आहे. काही अधिकारी अति हुशार आहेत. जात प्रमाणपत्र देताना खोडसाळपणा करतात, असा थेट आरोप नरेंद्र पाटील यांनी केला आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांकडून लावण्यात येणाऱ्या अटी-शर्तींवरून नरेंद्र पाटील यांनी नाराजी व्यक्त केली. संबंधित अधिकारी मराठा समाजातील असूनही अशा अटी का लावल्या जात आहेत, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

दरम्यान, २०२५ मध्ये प्रमाणपत्र घेऊन म हामंडळाच्या माध्यमातून कर्ज घेतलेल्या अनेक तरुणांना कागदपत्रे अपलोड करता न आल्याने लाभापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे मराठा समाजातील अनेक तरुणांचे फोन आल्याचा दावा देखील नरेंद्र पाटील यांनी केला. महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांनी घेतलेल्या निर्णयांविरोधात आपण लेखी पत्र दिले असून, मंत्रिमंडळाच्या उपसमि तीसह मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंर्त्यानाही तक्रार केल्याचं पाटील यांनी सांगितले. वारंवार तक्रारी करुनही कारवाई होत नसल्याने आता मराठवाड्याचा दौरा करत आंदोलनाची पूर्वतयारी सुरू केली आहे.

तरुणांच्या गाठीभेटी घेऊन जनजागृती करण्याचा उद्देश आहे, तसेच एकत्रित आल्याशिवाय सरकारला आक्रोश कळणार नाही असेही नरेंद्र पाटील म्हणाले.

### आसाममध्ये पुरामुळे जनजीवन विस्कळीत;मृतांचा आकडा ९८ वर

गुवाहाटी : ईशान्येकडील आसाम राज्यात पुराची गंभीर परिस्थिती कायम आहे. पुराचा जोर वाढत असल्याने परिस्थिती अधिकच बिकट होत चालली आहे आणि मृतांच्या संख्येतही दररोज वाढ होत आहे. ताज्या अहवालांनुसार, मृतांची एकूण संख्या ९८ वर पोहोचली आहे. आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या माहितीनुसार, या विनाशकारी पुराचा अनेक भागांवर गंभीर परिणाम झाला असून, यात ५७ पुरुष, २३ महिला आणि १८ मुलांचा (१२ मुले आणि ६ मुली) मृत्यू झाला आहे. सर्वाधिक फटका बसलेल्या भागांपैकी कचार जिल्ह्यात २२, तर शिवसागर जिल्ह्यात १० मृत्यूंची नोंद झाली आहे. इतर गंभीरपणे बाधित जिल्ह्यांमध्ये करीम गंज (९ मृत्यू) आणि गोलाघाट (६ मृत्यू) यांचा समावेश आहे; तसेच धेमाजी, नागाव, उदलगुरी, सोनितपूर आणि कार्बी आंगलाँग येथेही मृत्यूची नोंद झाली आहे.

# 'मेघालय भवन' विकास, संस्कृती आणि एकात्मतेचा संगम -मुख्यमंत्री

- दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत जमीन हस्तांतरण व भूमिपूजन सोहळा
- भारताच्या भविष्यातील विकासाचे मुख्य केंद्र नवी मुंबईच

दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र आणि ईशान्य भारतातील मेघालय ही केवळ दोन राज्ये नसून 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या संकल्पनेला मूर्त रूप देणारी सहोदर राज्ये आहेत, महाराष्ट्र आणि मेघालय यांच्यातील सांस्कृतिक व आर्थिक नाते अधिक दृढ होत असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. खारघर येथील प्लॉट नंबर १४, सेक्टर १६ येथे आयोजित 'मेघालय सदन' च्या जमीन हस्तांतरण व भूमिपूजन सोहळ्यात मुख्य अतिथी म्हणून ते बोलत होते. नवी मुंबई, ठाणे आणि रायगड हा संपूर्ण परिसर देशाच्या भविष्यातील अर्थव्यवस्थेला मोठी गती देणार असून, हाच परिसर भारताच्या विकासाचे पुढील मुख्य केंद्र ठरणार असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी मेघालयचे मुख्यमंत्री कॉनराड के. संगमा, मेघालयचे उपमुख्यमंत्री प्रेस्टोन टिनसोंग, मेघालयचे सामान्य प्रशासन विभाग मंत्री सोस्थेनिस सोहतुन यांच्यासह खासदार मिलिंद देवरा, आमदार मंदा म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, मेघालयचे मुख्य सचिव शकील अहमद, मेघालयच्या सामान्य प्रशासन विभागाचे आयुक्त व सचिव सिरिल व्ही. डी. डिएंगडोह, पनवेलचे महापौर नितीन पाटील, कोकण विभागीय महसूल आयुक्त रुबल अग्रवाल, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सिडकोचे मुख्य महाव्यवस्थापक अश्विन मुद्गल, सिडकोचे सहव्यवस्थापक राजा दयानिधी, सिडकोचे सहव्यवस्थापक गणेश देशमुख, पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये, पनवेल प्रांताधिकारी पवन चांडक, तहसिलदार मिनल भामरे तसेच मेघालयातील महाराष्ट्रात वास्तव्यास असणारे विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र आणि मेघालयच्या राज्यगीताने या सोहळ्याचा प्रारंभ झाला. मेघालयातील जगप्रसिद्ध पारंपारिक नृत्य शैलीत मेघालयीन कलाकरांनी सादरीकरण केले. याप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते मेघालयाचे मुख्यमंत्री कॉनराड के. संगमा यांच्याकडे मेघालय भवनसाठीच्या जमिनीची कागदपत्रे हस्तांतरित करण्यात आली.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी दोन्ही राज्यांमधील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अनुबंधांवर प्रकाश टाकला. ईशान्य भारतातील विद्यार्थी, कलाकार आणि संगीत क्षेत्रातील दिग्गजांसाठी मुंबई व पुणे ही अत्यंत पसंतीची ठिकाणे आहेत. विशेषतः मेघालयच्या आत्म्यात वसलेल्या संगीताचा मुंबईच्या संगीत जगताशी अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध आहे. त्यामुळेच खारघरसारख्या मोक्याच्या ठिकाणी आकारास येणारे हे मेघालय भवन केवळ एक इमारत नसून, मेघालयातून शिक्षणासाठी, वैद्यकीय उपचारांसाठी किंवा कला सादरीकरणासाठी येणाऱ्या नागरीक व विद्यार्थ्यांसाठी हक्काचे घर ठरेल.

नवी मुंबई परिसराच्या होत असलेल्या अभूतपूर्व विकासाचा उल्लेख करताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, या भागात जागतिक दर्जाच्या १२ अव्वल विद्यापीठांचा समावेश असणारी 'एज्यु-सिटी' आणि आंतरराष्ट्रीय दर्जाची 'मेडी-सिटी' उभारली जात आहे. सोबतच देशातील ६० टक्के डेटा सेंटर क्षमता याच परिसरात निर्माण होत असून, हे क्षेत्र न्यू-एज आणि डीप-टेक उद्योगांचे केंद्र बनत आहे. पुढील १० ते १५ वर्षांत जेव्हा मेघालयचे नागरिक या वास्तूचा वापर करतील, तेव्हा या नियोजित आणि भविष्याभिमुख जागेचे महत्त्व त्यांना अधिक स्पष्टपणे जाणवेल. मेघालय भवनचे बांधकाम लवकरात लवकर आणि उत्कृष्ट दर्जाचे पूर्ण करण्यासाठी सिडको किंवा राज्य सरकारच्या




यंत्रणांमार्फत सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी मेघालयचे माजी मुख्यमंत्री व लोकसभेचे माजी अध्यक्ष दिवंगत पी. ए. संगमा यांच्या संसदेतील अतुलनीय योगदानाचे भावूक स्मरण केले. अत्यंत खडतर राजकीय परिस्थितीतही चेहऱ्यावर हास्य ठेवून त्यांनी देशाची संसद कुशलतेने चालवली. त्यांचाच वारसा पुढे नेत मेघालयचे तरुण व गतिमान मुख्यमंत्री कॉनराड के. संगमा यांनी गेल्या ६ ते ७ वर्षांत मेघालयची अर्थव्यवस्था दुप्पट केली आहे, अशा शब्दांत त्यांनी त्यांच्या नेतृत्वाचे कौतुक केले. केवळ या भवनापुरते मर्यादित न राहता, येत्या काळात महाराष्ट्र आणि मेघालय हे दोन्ही राज्ये संस्कृती आणि अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांत परस्पर सहकार्याने अधिक वेगाने पुढे जातील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. नवी मुंबईतील मोक्याच्या ठिकाणी 'मेघालय भवन'साठी जमीन उपलब्ध करून दिल्याबद्दल मेघालयचे मुख्यमंत्री कॉनराड के. संगमा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सिडको आणि स्थानिक आमदार मंदा म्हात्रे यांचे विशेष आभार मानले. मुंबईत उपचारासाठी येणारे रुग्ण, विद्यार्थी आणि व्यावसायिकांची वाढती संख्या पाहता जुन्या मेघालय भवनमध्ये जागेची मोठी अडचण भासत होती. नीती आयोगाच्या बैठकीत संगमा यांनी विनंती करताच अवघ्या काही सेकंदांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जमिनीचा प्रस्ताव मान्य केला. या उपक्रमाला त्यांनी पूर्व आणि पश्चिम भारताला जोडणारा आणि देशाच्या एकात्मतेला अधिक बळ देणारा एक ऐतिहासिक टप्पा मानला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामुळेच ईशान्य भारतातील राज्ये आज देशात सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक बनली असल्याचे त्यांनी नमूद केले. महाराष्ट्रासोबतचे जुने संबंध आठवत संगमा यांनी आगामी काळात व्यापार, कृषी आणि संस्कृतीच्या क्षेत्रात भागीदारी अधिक मजबूत करण्याचा विश्वास व्यक्त केला. विशेषतः मेघालयची जगप्रसिद्ध 'लाखडोंग हळद', क्रीडा क्षेत्र आणि तेथील समृद्ध संगीत परंपरा मुंबई व महाराष्ट्राच्या माध्यमातून जगभरात पोहोचवण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. हे काम विक्रमी वेळेत पूर्ण करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांचे आभार मानत, त्यांनी 'मेघालय भवन'चे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.

नवी मुंबईतील 'मेघालय भवन'च्या भूखंड हस्तांतरण प्रसंगी प्रास्ताविक करताना मेघालयचे मुख्य सचिव शकील अहमद यांनी या प्रकल्पासाठी जमीन उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र शासन, सिडको आणि स्थानिक लोकप्रतिनिधींचे विशेष आभार मानले. मुंबईत वैद्यकीय उपचारासाठी येणारे रुग्ण, शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि उद्योजकांसाठी हे मेघालय भवन अत्यंत मोलाचे ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. तसेच, महाराष्ट्राच्या सहकार्यामुळे मेघालयला आरोग्य, व्यापार आणि पर्यटनाच्या क्षेत्रात प्रगतीचे नवे मार्ग मिळतील, असे सांगत त्यांनी नव्याने लाभलेल्या खंबीर नेतृत्वामुळे मेघालय ही देशातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था ठरल्याचे अधोरेखित केले.

वृत्तविशेष...

## नंदुरबार हादरले! पपईच्या शेतात रचायचा विकृत खेळ; गुप्त फोल्डरने ५१ चिमुकल्यांच्या शोषणाचे रहस्य

**दैनिक आपला विदर्भ**

**नंदुरबार । प्रतिनिधी** : पैशांचे आमिष, भीती आणि ब्लॅकमेलिंगच्या जोरावर अल्पवयीन मुलांसह समवयस्क युवकांचे लैंगिक शोषण करणाऱ्या एका २२ वर्षीय विकृत तरुणाचा काळा खेळ नंदुरबार पोलिसांनी उघडकीस आणला आहे. पोलिसांनी रचलेल्या जाळ्यात अडकलेल्या या नराधमाला बेड्या ठोकण्यात आल्या असून, त्याच्या मोबाईलमध्ये ५० हून अधिक पीडितांचे आक्षेपार्ह व्हिडिओ आणि छायाचित्रे आढळल्याने संपूर्ण नंदुरबार जिल्हा हादरला आहे. चेतन प्रकाश कोळी (वय २२ , रा. रायसिंगपुरा, नंदुरबार) असे अटक करण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे.

संशयित चेतन कोळी हा शहरातील अल्पवयीन मुले आणि तरुणांना पैशाचे आमिष दाखवून स्वत:च्या जाळ्यात ओढायचा. त्यांच्याशी जवळीक साधून लैंगिक शोषण केल्यानंतर त्यांचे अील व्हिडिओ व फोटो मोबाईलमध्ये गुप्त फोल्डरमध्ये काढून ठेवत असे. याच डिजिटल सामग्रीचा वापर करून तो पीडितांना धमकावत व ब्लॅकमेल करत असे. २०२२ पासून, म्हणजेच तब्बल चार वर्षापासून हा किळसवाणा प्रकार सुरू होता.

६ ऑगस्ट रोजी संशयित चेतन एका अल्पवयीन मुलाला भेटण्यासाठी भोणे फाटा परिसरातील पपईच्या शेतात येणार असल्याची पक्की माहिती शहर पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांना मिळाली. त्यांनी तातडीने वरिष्ठांना कल्पना देऊन विशेष पथकाची स्थापना केली. साध्या वेषातील पोलिसांनी परिसरात सापळा रचून संशयित घटनास्थळी पोहोचताच त्याला रंगेहात ताब्यात घेतले.

पंच आणि फॉरेन्सिक तज्ज्ञांच्या उपस्थितीत संशयिताच्या मोबाईलची तपासणी केली असता, त्यात एक गुप्त फोल्डर मिळून आले. या फोल्डरमध्ये अनेक अल्पवयीन मुलांचे आक्षेपार्ह व्हिडिओ आणि फोटो आढळले. पोलिसांनी हे सर्व डिजिटल पुरावे जप्त केले आहेत. प्राथमिक तपासात आणि मोबाईलमधील पुराव्यांवरून ५१ हून अधिक बालके व तरुण याचे शिकार ठरल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

याप्रकरणी नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता, लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम (झजउडज) आणि बालकांची काळजी व संरक्षण अधिनियमांनुसार गंभीर गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक अश्विनी सानप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अमोल देशमुख पुढील तपास करत असून, मोबाईलमधील संपर्क व तांत्रिक माहितीच्या आधारे सर्व पीडितांची ओळख पटवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

## शिंदेंचा मारकुटा नगरसेवक रमेश म्हात्रे अखेर २० दिवसांनंतर तुरुंगाबाहेर, सुटका होताच म्हणाला....

**दैनिक आपला विदर्भ**

**नवी मुंबई । प्रतिनिधी :** डोंबिवली डॉक्टर मारहाण प्रकरणातील मुख्य आरोपी नगरसेवक रमेश सुकऱ्या म्हात्रे अखेर २० दिवसांनी तुरुंगाबाहेर आला. मुंबई उच्च न्यायालयाने पूर्वी मिळालेला जामीन रद्द केल्यानंतर म्हात्रे याला तुरुंगाची हवा खावी लागली. जामिनावर बाहेर येताच न्यायालयाचा निर्णय मला मान्य असेल, अशी सावध प्रतिक्रिया त्याने दिली.



रुग्णालयातील डॉक्टर आणि परिचारिकेला अमानुष मारहाण केल्याप्रकरणी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा नगरसेवक रमेश म्हात्रे २० दिवस कारावासात होता. मुंबई उच्च न्यायालयाने अटी शर्तींसहित जामीन मंजूर केल्यानंतर शनिवारी म्हात्रे तुरुंगाबाहेर आला. म्हात्रेसह अन्य तीन आरोपींनाही प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांनी आरोपपत्र दाखल होईपर्यंत महाराष्ट्राबाहेर रहायचे, या अटीवर जामीन मंजूर केला.

डॉक्टर आणि नर्स मारहाण प्रकरणामुळे नगरसेवक म्हात्रे याच्याविरोधात राज्यात तीव्र संतापाची लाट उसळली होती. वैद्यकीय क्षेत्रातील संघटनांनी या मारहाणीचा निषेध करत आरोपींवर कठोर कारवाईची मागणी केली होती. या प्रकरणात हायकोर्टाच्या आदेशानंतर रमेश म्हात्रे याचा जामीन रद्द होऊन त्याला कोठडीत पाठवण्यात आले होते.तुरुंगात असताना म्हात्रे यांनी जामिनासाठी न्यायालयात केलेली विनवणी विशेष चर्चेत राहिली. पाहिजे तर मला राज्यातून हद्दपार करा, पण मला जामीन द्या आणि तुरुंगाबाहेर काढा, अशी गयावया म्हात्रे याने न्यायालयासमोर केली होती. अखेर २० दिवसांनी त्याला न्यायालयाने जामीन दिला.

२० दिवसांनंतर कारागृहातून बाहेर आल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना रमेश म्हात्रे याने अत्यंत सावध भूमिका घेतली. डॉक्टर मारहाण प्रकरण हे सध्या न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे या विषयावर जास्त बोलणे उचित ठरणार नाही. न्यायालय या प्रकरणी जो काही निर्णय देईल, तो मला पूर्णपणे मान्य असेल, असे रमेश म्हात्रे म्हणाला.

# श्री गुरु तेग बहादुरजींचे सर्वोच्च बलिदान मानवी हक्क आणि धार्मिक स्वातंत्र्याचा दीपस्तंभ - राज्यपाल जिष्णु देव वर्मा

**दैनिक आपला विदर्भ**

**नवी मुंबई । प्रतिनिधी :** अन्य धर्माच्या अनुयायांच्या धार्मिक स्वातंत्र्याचे आणि मानवी प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी स्वतःच्या प्राणांचे बलिदान देणारे श्री गुरु तेग बहादुरजी यांचे जीवन आणि विचार हे केवळ ऐतिहासिक स्मरण नसून आधुनिक लोकशाही, सामाजिक सौहार्द आणि धार्मिक स्वातंत्र्याचा जिवंत दीपस्तंभ आहेत, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

श्री गुरु तेग बहादुरजी यांच्या ३५० व्या शहादत दिनाचे औचित्य साधून नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर येथील पंजाब हेरिटेज भवन येथे आयोजित 'श्री गुरु तेग बहादुरजी यांचा वारसा' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालय, साहित्य अकादमी नवी दिल्ली आणि पंजाबी कल्चरल अँड वेल्फेअर असोसिएशन, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने याचे आयोजन केले होते.

यावेळी वनमंत्री गणेश नाईक, आमदार मंदा म्हात्रे, नवी मुंबई महापालिकेच्या महापौर सुजाता पाटील, कोकण विभागीय महसूल आयुक्त रुबल अग्रवाल, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नरनावरे, ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे, साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक, उपाध्यक्ष कुमुद शर्मा, हरियाणा साहित्य आणि सांस्कृतिक अकादमीचे अध्यक्ष कुलदीप चंद्र अग्निहोत्री, साहित्य अकादमीचे सचिव वरुण गुलाटी, प्रशासक तख्तश्री अबचल नगर, हुजूर साहिब विजय सतबीर सिंह, राज्यपालांचे संयुक्त सचिव एस. राममूर्ती यांच्यासह साहित्यिक, विद्वान आणि सिख समाजातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यपाल वर्मा यांनी भाषणाच्या सुरुवातीस महाराष्ट्र आणि पंजाब या दोन्ही राज्यांमधील शतकानुशतकांच्या समृद्ध आध्यात्मिक व सांस्कृतिक नात्याचा गौरव केला. महाराष्ट्र ही संतांची पावन भूमी असून संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि संत एकनाथ यांच्या भूमीतून संत नामदेव महाराज भक्तीचा संदेश घेऊन पंजाबमध्ये गेले होते, ज्यांच्या पवित्र रचना आजही 'श्री गुरु ग्रंथ साहिब' मध्ये आदरपूर्वक विराजमान आहेत. तसेच कालंतराने श्री गुरु गोविंदसिंहजी महाराष्ट्रातील नांदेड येथे आले आणि तेथे स्थापित 'तख्त श्री हजूर साहिब' हे दोन्ही राज्यांमधील या अनोख्या सांस्कृतिक बंधाची साक्ष देत आहे, असे सांगताना राज्यपाल म्हणाले की, महाराष्ट्र आणि पंजाब ही समान मूल्ये, आदर्श आणि धैर्याची जपणूक करणारी 'जुळी राज्ये' आहेत.

श्री गुरु तेग बहादुरजी यांनी १६७५ मध्ये दिलेले सर्वोच्च बलिदान हे भारताच्या नागरी आणि सांस्कृतिक इतिहासातील अत्यंत अद्वितीय आणि प्रेरणादायी अध्याय असल्याचे सांगत राज्यपालांनी अधोरेखित केले की, गुरुंनी केवळ स्वतःच्या अनुयायांसाठीच नव्हे, तर प्रत्येक मानवाला भीतीशिवाय आपापल्या धर्माचे आचरण करण्याचा अधिकार आहे या



सार्वभौम मूल्यासाठी 'हिंद दी चादर' बनून प्राणाहुती दिली. भारतीय संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये शतकांआधीच गुरुजींनी आपल्या जीवनकार्यातून प्रत्यक्ष जगून दाखवली होती. आजच्या सामाजिक आणि मानसिक ताणतणावाच्या काळात गुरुजींची शिकवण आपल्याला आंतरिक शक्ती, नम्रता, करुणा आणि निष्काम सेवेची दिशा दाखवते.

गुरुजींचे विचार केवळ चर्चासत्रांपुरते मर्यादित न ठेवता ते पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी संस्थात्मक प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे सांगत राज्यपालांनी एक महत्त्वाची शिफारस केली. महाराष्ट्रात असलेल्या ६५ सार्वजनिक व खाजगी विद्यापीठांपैकी एका विद्यापीठात 'श्री गुरु तेग बहादूर अध्यासन' () स्थापित करण्यात यावे, असे आवाहन त्यांनी केले. हे अध्यासन आंतरधर्मीय संवाद, संशोधन, अध्यापन आणि गुरुजींच्या विवेकबुद्धीच्या स्वातंत्र्याच्या संदेशाचा प्रचार-प्रसार करणारे कायमस्वरूपी केंद्र ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. साहित्य अकादमी आणि पंजाबी कल्चरल ॲण्ड वेल्फेअर असोसिएशनने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे राज्यपालांनी मनःपूर्वक कौतुक केले.

केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी या प्रसंगी दिलेल्या ध्वनी संदेशात म्हटले आहे की, श्री गुरु तेग बहादुरजी यांचे बलिदान हे कोणालाही भयभीत न करता कोणाच्याही भयापुढे न झुकणाऱ्या खऱ्या ज्ञानाचे आणि मानवी स्वातंत्र्याचे अमर प्रतीक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार या ऐतिहासिक ३५० व्या शहादत दिनानिमित्त देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करत आहे, जेणेकरून येणाऱ्या पिढ्यांना गुरुजींच्या महान त्यागातून आणि अमूल्य संदेशातून निरंतर प्रेरणा मिळावी. गुरुजींचे विचार हे क्षेत्र, भाषा आणि समुदायाच्या सीमा ओलांडून एकता, साहस, करुणा आणि सेवेवर आधारित 'विकसित भारत' घडवण्याचा राष्ट्रीय संकल्प पुन्हा दृढ करणारे आहेत.

हरियाणा साहित्य आणि संस्कृती अकादमीचे अध्यक्ष डॉ. कुलदीप चंद अग्निहोत्री यांनी आपल्या भाषणात 'धर्मो रक्षति रक्षितः' या सनातनी मूल्याचा उल्लेख करत, जेव्हा जेव्हा धर्मावर संकट आले तेव्हा श्री गुरु तेग बहादुरजींसारख्या महापुरुषांनी दिलेल्या बलिदानामुळेच भारतीय संस्कृती हजारो वर्षांपासून अखंड टिकून असल्याचे सांगितले. गुरू नानक देवजींपासून सुरु झालेल्या ध्येयनिष्ठ परंपरेचा मागोवा घेतला.

साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुरजी यांच्या बलिदानाचे आणि संरक्षणाचे स्मरण करत, त्यांची परंपरा मानवाला समाधीकडून शहादतीकडे आणि शहादतीकडून समाधीकडे नेणारा मार्ग दाखवते असे सांगितले. गुरुजींच्या ३५० व्या शहादत दिनानिमित्त देशभरातील पाच प्रमुख केंद्रांमध्ये आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रांच्या मालिकेतील हे तिसरे पुष्प महाराष्ट्राच्या पुण्यभूमीत गुंफण्यात आल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. जगातील सर्व साहित्यिक आणि इतिहासकार गुरूजींच्या या अजोड बलिदानाचा आदर करतात असे सांगत, ज्या महान संस्कृतीची हस्ती जगात कधीही मिटली नाही, त्या समृद्ध वारशाचे आपण सर्व वाहक आहोत, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

साहित्य अकादमीच्या उपाध्यक्ष प्रा. कुमुद शर्मा यांनी आभार मानले.

## अभिजीत दिपकेंनी त्या पोलीस अधिकाऱ्याची पाय धरून माफी मागावी, पोलीस बॉईज संघटनेची मागणी, नाहीतर...

**बीड । प्रतिनिधी** : नीट पेपर लिक प्रकरणी दिल्लीत जंतरमंतर मैदानावर यशस्वी आंदोलन करणारे कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांच्या छत्रपती संभाजीनगरमधील घरी सध्या भेटण्यासाठी लोकांची गर्दी उसळली आहे. अशातच साध्या वेशात एका पीआयच्या हस्तक्षेपामुळे वाद निर्माण झाला होता. दिपकेंनी संबंधित पीआयला फटकारलं होतं. पण, आता पोलीस बॉईस संघटनेनं दिपकेंनी संबंधित पीआयची पाय धरून माफी मागावी अशी मागणी केली आहे.

कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांच्या निवासस्थानाच्या बाहेर एका पोलीस अधिकाऱ्याने साध्या वेशामध्ये भेटण्यासाठी गेला होता. यावेळी संबंधित पीआयने अभिजीत दिपके यांना कुणाला भेटायचं, याबद्दल काही सांगितल्याचा आरोप दिपकेंनी केला होता. त्यावरून दिपकेंनी या पोलीस अधिकाऱ्याला सगळ्यांसमोर झापले होते.

या थांबलेल्या पोलीस अधिकाऱ्याला त्यांनी इथून निघून जा, असे म्हटले होते. त्यावर आता पोलीस बॉईज संघटना आक्रमक झाले असून अभिजीत दिपके यांनी त्या पोलिस पोलीस अधिकाऱ्याची पाय धरून माफी मागावी अन्यथा आम्ही रस्त्यावर उतरून लोकशाही मार्गाने आंदोलन करू, असा इशारा पोलीस बॉईज संघटनेने दिला आहे.

तसेच, पोलीस हे त्यांच्या संरक्षणासाठीच काम करत आहेत. ती जबाबदारी पोलिसांची आहे.

## सगळेच अवाक! संघप्रमुखांच्या कार्यक्रमात भाजपा आमदारांच्या रांगेत थेट अंबादास दानवे; राजकीय वर्तुळात खळबळ!



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा । प्रतिनिधी** : जिल्ह्यातील खामगाव येथे आज एका आदिवासी निवासी शाळेच्या कार्यक्रमात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमात भाजप आमदार श्वेता महाले आणि आमदार संजय कुटे यांच्यासोबत शिवसेना उबाठाचे आमदार अंबादास दानवे यांची हजेरी पाहून राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. अंबादास दानवे हे गेल्या काही काळात भाजपा आणि संघावर सातत्याने टीका करत आले आहेत. तरीही संघप्रमुखांच्या कार्यक्रमात भाजपा आमदारांच्या रांगेत बसून त्यांनी हजेरी लावल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. स्थानिक राजकीय निरीक्षकांनुसार, हा प्रसंग केवळ औपचारिक उपस्थितीचा नाही तर राजकीय संदेश देणारा ठरू शकतो.

उपस्थितीचा मुद्दाच चर्चेचा केंद्रबिंदू : कार्यक्रमात सरसंघचालक मोहन भागवत यांनी आदिवासी समाजाच्या शिक्षण, विकास आणि सामाजिक एकात्मतेबाबत मार्गदर्शन केले. मात्र उपस्थितीचा मुद्दाच चर्चेचा केंद्रबिंदू ठरला. ठाकरे शिवसेनेत दानवे हे सक्रिय नेते मानले जातात. त्यामुळे उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांची याबाबत काय प्रतिक्रिया येते, हा आता सर्वांच्या उत्सुकतेचा विषय बनला आहे.

काही भाजपा कार्यकर्त्यांनी याला 'सकारात्मक' म्हटले तर विरोधकांनी 'राजकीय संभ्रम' असा शब्द वापरला. बुलढाणा जिल्ह्यातील राजकारणात अशा मिश्र उपस्थितीने नवीन चर्चा सुरू झाली आहे. आगामी काळात पक्षीय शिस्त आणि वैचारिक स्पष्टतेबाबत नेत्यांकडून काय भूमिका घेतली जाते, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# आदिवासींनी संस्कृती व इतिहास जपला: शरद पवार

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी** : आदिवासी समाजाने देशाची संस्कृती, परंपरा जपली आहे. जल – जंगल – जमिनीचे संरक्षण केले आहे. निसर्गाची साथ असेल अथवा नसेल, किती ही मोठे संकट आले तरी त्यांनी संस्कृतीच्या रक्षणासाठी कधीही तडजोड केली नाही. एखांद्या आदिवासीला काम करण्याची संधी मिळाली, तर ते इतिहास निर्माण करतात, असे गौरवोद्गार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष, खासदार शरद पवार यांनी काढले. मुंबईत आयोजित 'आदिवासी संस्कृती उत्सव वनरंग – २०२६' कार्यक्रमाला उपस्थित राहून, त्यांनी आदिवासींशी संवाद साधला.

अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे मंत्री नरहरी झिरवळ यांनी मुंबईत आदिवासींच्या संबंधित या उत्सवाचे आयोजन केले आहे. सांस्कृतिक कार्यक्रम महत्त्वाचा भाग आहेच, पण आदिवासी कुटुंबांमध्ये ज्या अनेक प्रकारच्या पदार्थांची निर्मिती होते त्यांचेही प्रदर्शन आयोजित केले आहे. त्यामुळे झिरवळांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे औत्सुक्य होते. आदिवासींनी पुष्कळ वर्ष जपलेली संस्कृती, संगीत आणि कला बघायला मिळाली.



या देशामध्ये १५० वर्ष इंग्रजांचे राज्य होते आणि या इंग्रजांविरुद्ध लढण्यासाठी आदिवासी जमातीने प्रचंड त्याग केला. राघोजीराव भांगरे असतील किंवा त्यांच्यासारख्या अनेकांनी ब्रिटिशांच्याविरुद्ध लढा दिला. देशाच्या स्वातंर्त्यासाठी त्यांनी शौर्य दाखवले. साहजिकच आदिवासींच्या शौर्याचा इतिहास आपल्याला बघायला मिळतो. या कार्यक्रमात डॉ. विलास गवारी यांनी 'उठाव' आणि 'पेठची शौर्यगाथा' हे ग्रंथ प्रकाशित केले. हे ग्रंथ वाचल्यानंतर नव्या पिढीला प्रेरणा मिळेल, असेही पवार म्हणाले.

नरहरी झिरवळ यांनी महाराष्ट्रात महत्त्वाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली. महाराष्ट्राच्या विधानसभेत आम्हाला अध्यक्ष, उपाध्यक्षांची निवड करायची होती. आम्ही लोकांनी झिरवळांचे नाव सुचविले. काही लोक म्हणाले, सभागृह चालवणे साधी गोष्ट नाही, त्यांच्याकडून हे कसे होणार ? तरीही आम्ही त्यांना संधी दिली. त्यांचे भाग्य असे की, ते उपाध्यक्ष झाले आणि काही दिवसांतच अध्यक्षांची जागा रिक्त झाली. त्यामुळे अध्यक्षांची सगळी जबाबदारी त्यांनी समर्थपणाने चालवली.

महाराष्ट्राला हे बघायला मिळाले की, आदिवासीला संधी मिळाली तर ते इतिहास निर्माण करतात. झिरवळांनी महाराष्ट्राच्या विधिमंडळात एक इतिहास निर्माण केला. आज राज्याच्या मंत्रिमंडळात ते कॅबिनेट मंत्री म्हणून काम करतात. देशाच्या लोकसभेत आमच्या समवेत खासदार भास्कर भगरे आहेत, तेही अतिशय उत्तम काम करतात. याचा अर्थ एकच आहे की, संधी दिली पाहिजे, शक्ती दिली पाहिजे, मग आपल्याला त्यांच्या कर्तृत्वाचे दर्शन होईल. हेच काम या तीन दिवसांच्या उत्सवामधून होत आहे. या बद्दल झिरवळ यांचे अभिनंदन करतो. या कामात आम्ही त्यांच्याबरोबर आहोत, असेही पवार म्हणाले.

# नागपुरात मतदार यादीत फेरफार? प्रफुल्ल गुडधेंचे पुराव्यांसह भाजपवर गंभीर आरोप!

**दैनिक आपला विदर्भ**


**नागपूर । प्रतिनिधी** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दक्षिण-पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघातील मतदारांची नावे पुणे, पालघर, नालासोपारा, शिरूर आणि नंदुरबार येथील मतदार याद्यांमध्ये समाविष्ट झाल्याचा आरोप काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रफुल्ल गुडधे यांनी केला. आठ मतदार आणि संबंधित कागदपत्रे पत्रकार परिषदेत सादर करून त्यांनी भाजपचे शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी यांना राजकीय संन्यासाचे आव्हान दिले.

**पुरावे सादर; तिवारींना आव्हान**

नागपुरातील मतदारांची नावे परस्पर राज्यातील अन्य शहरांच्या मतदार यादीत समाविष्ट केली जात असल्याचा आरोप गुडधे यांनी यापूर्वी केला होता. भाजपने नियुक्त केलेल्या खासगी कंपनीतील व्यक्तींकडून ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरून हा प्रकार केला जात असल्याचा दावा त्यांनी केला होता. तिवारी यांनी हा आरोप बिनबुडाचा असल्याचे सांगत गुडधे यांनी पुरावे सादर करावेत; अन्यथा राजकारणातून संन्यास घ्यावा, असे आव्हान दिले होते. या पार्श्वभूमीवर गुडधे यांनी शनिवारी पत्रकार परिषद घेऊन आठ मतदारांची नावे, त्यांच्या मतदार यादीतील नोंदी आणि संबंधित कागदपत्रे सादर केली. या मतदारांना त्यांनी पत्रकार परिषदेत उपस्थितही केले. संबंधित आठही मतदार दक्षिण-पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघातील रहिवासी असल्याचा दावा त्यांनी केला.

फॉर्म क्रमांक ८ च्या गैरवापराचा आरोप

२०२४ मध्ये संबंधित मतदारांची नावे दक्षिण-पश्चिम नागपूर मतदारसंघातील मतदार यादीत होती. मात्र, २०२६ मध्ये त्यांची नावे राज्यातील अन्य मतदारसंघांमध्ये आढळल्याचा दावा गुडधे यांनी केला. शीला शरद पाटील यांचे नाव शहादा (नंदुरबार), मैरी जेविएर जॉर्ज व पिटर जेविएर जॉर्ज यांची नावे पिंपरी-मावळ (पुणे), तर खान इश्तियाक बदरुद्दीन, वहाब शेख, अशफाक बहाब शेख आणि सैफुद्दीन खान यांची नावे



नालासोपारा (पालघर) येथील मतदार यादीत असल्याचे त्यांनी सांगितले. फॉर्म क्रमांक ८ चा गैरवापर करून हे स्थलांतर करण्यात आल्याचा आरोपही गुडधे यांनी केला. संबंधित मतदारांनी फॉर्म क्रमांक ८ भरलेला नसल्याचा दावा त्यांनी केला. तसेच हे सर्व मतदार अद्याप नागपुरातच वास्तव्यास असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**'शब्दाचे पक्के आहेत, संन्यास घेतील'**

संबंधित प्रकारात किमान १५ ते २० मतदारांचे अन्य मतदारसंघांत स्थलांतर झाल्याचा आरोप गुडधे यांनी केला. संबंधित मतदारांमध्ये मुस्लिम, अनुसूचित जाती, ख्रिश्चन आणि ओबीसी समाजातील व्यक्तींचा समावेश असल्याचेही त्यांनी सांगितले. या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. 'दयाशंकर तिवारी शब्दाचे पक्के आहेत. त्यामुळे आता ते राजकारणातून संन्यास घेतील,' असे म्हणत गुडधे यांनी तिवारी यांच्यावर उपहासात्मक टीका केली.

**'महापालिकेत कोणत्या अधिकारात बैठका?'**

महापालिकेत कोणतेही अधिकृत पद नसताना दयाशंकर तिवारी कोणत्या अधिकारात बैठका घेत आहेत, असा सवालही गुडधे यांनी उपस्थित केला. नगरसेवकांना सल्ला द्यायचा असल्यास तिवारी यांनी नामनिर्देशित सदस्य म्हणून महापालिकेत यावे, असे ते म्हणाले. तिवारी यांनी अलीकडे आरोग्य समितीची बैठक घेतली होती. तसेच नदी-नाल्यांच्या सफाईबाबत प्रशासनाला निर्देश दिल्याचा दावाही गुडधे यांनी केला.